# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन, शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ व्दारा स्थापित, व महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

## महाविद्यालयीन शाखा

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविंद्रनाथ टागोर मार्ग, नागपूर–४४० ००१, दुरध्वनी क्रमांक: ०७१२–२५२९९३२

फॅक्स नं. ०७१२–२५५५००१, Email ID : infoarcollege@ymail.com


क्र. रातुमनावि/म.वि./प्रवेशक्षमतावाढ/ 2858 दिनांक 12 / 07 / २०१६.

प्रती,

प्राचार्य/अध्यक्ष/सचिव,
सर्व संलग्नित व संचालीत महाविद्यालये,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

विषय :— सत्र २०१६—१७ साठी मंजुर प्रवेश क्षमतेच्या २० टक्के जास्तीचे प्रवेश वाढवून देण्याबाबत.

महोदय,

आपणांस कळविण्यात येते की, उन्हाळी २०१६ च्या १२ वी च्या परिक्षेचा निकाल मोठ्या प्रमाणात लागलेला असल्यामुळे विद्यार्थी प्रवेशापासून वंचीत राहू नये याकरीता महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम ८३ (३) (सी) नुसार विद्यापीठाला प्रवेश क्षमता मंजूरीचे असलेल्या अधिकारांतर्गत प्रवेश क्षमता वाढीबाबत विद्यापीठाशी संलग्नित व विद्यापीठाद्वारे संचालीत महाविद्यालयातील ज्या पदवीस्तरावरील (UG) अभ्यासक्रमाचे प्रवेश केंद्रीय प्रवेश पध्दतीने होत नाही अशा सर्व पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता मंजूर प्रवेश क्षमतेच्या २० टक्यांनी फक्त सत्र २०१६—१७ करीता वाढविण्याची बाब प्रस्तावीत आहे.

करिता आपणांस विनंती करण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील ज्या अभ्यासक्रमात मंजुर प्रवेश क्षमतेनुसार प्रथम वर्षाचे प्रवेश पुर्ण झाल्यानंतर देखील विद्यार्थी प्रवेशासाठी प्रतिक्षा यादीत आहेत, अशा अभ्यासक्रमांची प्रवेश क्षमता मंजुर प्रवेश क्षमतेच्या २० टक्के वाढवून देण्याकरिता विद्यापीठाकडे दि. २०/०७/२०१६ पर्यंत प्रस्ताव सादर करावा. प्रस्ताव सादर करतांना मंजुर प्रवेश क्षमतेनुसार प्रथम वर्षातील प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी आणि प्रतिक्षा यादीत असलेल्या विद्यार्थ्यांची यादी प्रमाणित करुन प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक राहील. यापुर्वी ज्या महाविद्यालयांनी वरिलप्रमाणे प्रस्ताव सादर केला असल्यास नव्याने प्रस्ताव सादर करण्याची आवश्यकता नाही. अतिरीक्त प्रवेश क्षमता ही केवळ सन २०१६—१७ पुरतीच मर्यादीत राहील व या पोटी शिक्षकांचा कार्यभार वाढल्यास कोणताही आर्थिक भार शासनावर येणार नाही या अटीवर वाढीव क्षमतेपोटी कोणत्याही महाविद्यालयांना नवीन तुकडी तसेच नवीन अतिरिक्त पद मंजूर केले जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे.

आपला

(डॉ.डी.के.अग्रवाल)
संचालक (म.वि.वि.मं.)
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ